# पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर, यांचेकार्यालय,

मिलकॉर्नर,डॉ.बाबासाहेबआंबेडकररोड,औरंगाबाद-431001.
दुरध्वनी क्रमांक-0240-2326524,फॅक्सक्र.0240-2240596.
ईमेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in


---

गोपनिय जा.क्र.विशा-५/आदेश/औबाद/२०१९- ५४ औरंगाबाद, दिनांक.१९ /०३/२०१९

## फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई आदेश.

**आदेश :-**

ज्या अर्थी मा. भारत निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांनी दि.१०/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व ४८ मतदार संघातून लोकसभेचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. तसेच दिनांक १० मार्च २०१९ ते निवडणुकीची प्रक्रिया पुर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत भारत निवडणुक आयोगाने संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू केली आहे.

निवडणुक आचार संहितेच्या कालावधीत आचार संहितेचा भंग होऊ नये तसेच शांततेत निवडणुक पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून औरंगाबाद शहर पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय, सर्व शासकीय व निमशासकीय विश्रामगृहे यांचे आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षांनी निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी, त्यांच्या हितचिंतकांनी सभा घेणे, सदरील आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणुक संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट, कट आऊट्स, पेन्टींगस्, होर्डींग्ज लावणे, तसेच निवडणुक विषयक घोषवाक्य लिहीणे किंवा सदरील आवारात निवडणुक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे, इत्यादी बाबींवर तात्काळ निर्बंध घालण्याची गरज असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्या अर्थी **मी, डॉ.दिपाली धाटे-घाडगे,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,औरंगाबाद शहर फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ अन्वये** मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे वरील ठिकाणी वरील प्रमाणे कृती करण्यास दिनांक २०/०३/२०१९ पासून ते आचार संहीता संपेपर्यंत निर्बंध घालीत आहे.

सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी माध्यमे, सर्व पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी कार्यालय, छावणी मंडळ, महानगर पालिका, मध्यवर्ती

बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मुख्य बाजारपेठा, सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकावर चिटकावुन प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज **दिनांक.** १९ **/०३/२०१९** रोजी औरंगाबाद येथे जारी करण्यात आला आहे.

**( डॉ.दिपाली धाटे-घाडगे )**
पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,
औरंगाबाद शहर

प्रति :-

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, औरंगाबाद शहर.
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.
३)सर्व पो.स्टे./शाखा, प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर.

प्रतिलिपी :-

१)विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२)जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
३)म.न.पा.आयुक्त,औरंगाबाद.
४)उपायुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, औरंगाबाद.
५)जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.
६)केंद्र संचालक, आकाशवाणी, औरंगाबाद.
७)सोशल मिडीया,गुन्हे शाखा,औरंगाबाद.